ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख ८ जून, १९६० | अंक ११

## विविध माहिती

**गोहाटी येथील तेलाचा कारखाना**—गोहाटी येथें उभारण्यांत येत असलेल्या तेलशुद्धीच्या कारखान्याचें काम जोरांत चालू असून तें ठरलेल्या तारखेपेक्षा लवकर पूर्ण होण्याचा बराच संभव आहे. ह्या कारखान्यामुळें आसाममध्यें नवे नवे उद्योगधंदे काढण्यास चांगलें उत्तेजन मिळेल. अर्थातच रोजगार अधिक प्रमाणावर उपलब्ध होऊं लागेल.

**मार्टिन बोरमन जिवंत**—दुसऱ्या महायुद्धांत लाखों ज्यू लोकांची भीषण हत्या करणारा नाझी पुढारी ॲडॉल्फ आइकमन ह्याला इस्राइलमध्यें अटक करण्यांत आली आहे. आइकमननें अशी माहिती सांगितली आहे, कीं हिटलरचा अगदीं निकटचा सहकारी मार्टिन बोरमन अद्याप जिवंत आहे. २ मे, १९४५ रोजीं बोरमन जर्मनींतून पळाला होता.

**सुताच्या किंमती कमी केल्या**—पाकिस्तान सरकारच्या आर्थिक सल्लागार समितीनें सुताच्या किंमती कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणें जाडेंभरडें कापड व मध्यम प्रतीचें कापड ह्यांच्या किंमतीहि उतरविण्यांत आल्या आहेत. ह्या मालाच्या नव्या किंमती ठरविण्यांत आल्या असून त्या १ जूनपासून अमलांत आल्या आहेत.

**टक्कल पडलेला पण देखणा**—फ्रान्समध्यें टक्कल पडलेल्या लोकांची पहिली कॉंग्रेस भरविण्यांत आलीं होती. ह्या कॉंग्रेस-मध्यें भाग घेण्यासाठी ५० प्रतिनिधी आले होते. त्यांपैकी एका इटालिअन उद्योगपतीला 'टक्कल पडलेला सर्वांत देखणा पुरुष' म्हणून बक्षीस देण्यांत आलें. आलेल्या स्पर्धकांची परीक्षा करण्याचें काम स्त्रियांच्या ज्यूरीनें केलें.

**अन्नधान्याची वाहतूक**—अमेरिका व भारत ह्यांच्यांत नुकत्याच झालेल्या कराराप्रमाणें अमेरिका भारताला १·७० कोटी टन अन्नधान्य पुरविणार आहे. धान्याची सर्व वाहतूक अमेरिकन बोटींतून करण्यांत येणार आहे. अमेरिकन कायद्या-प्रमाणें ५० टक्के वाहतूक अमेरिकन बोटींतून करणें आवश्यक असलें तरी बाकीची ५० टक्के वाहतूक इतर देशांच्या वाहतूक कंपन्यांना करूं द्यावी, असें ब्रिटनचें मत आहे.

**केरळमधील शाळांचीं पुस्तकें**—केरळच्या कम्युनिस्ट सरकारनें समाजविषयक अभ्यासाचीं जीं पुस्तकें माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी तयार केलीं होतीं, त्यांची आतां पूर्णपणें उजळणी करण्यांत आली आहे. विद्यार्थ्यांच्या मनावर कम्युनिझमची छाप पाडण्यासारखा सर्व मजकूर नव्या पुस्तकांतून वगळण्यांत आला आहे. ह्यासंबंधी नेमण्यांत आलेल्या कमिटीच्या शिफारसीला धरून नवीं पुस्तकें तयार करण्यांत आलीं आहेत.

**मध्यप्रदेशांत आणखी शाळा**—मध्यप्रदेशांतील महाकोशल विभागांत प्राथमिक शिक्षणाचा विस्तार करण्याचें राज्यसरकारनें ठरविलें आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनीं चालविलेल्या प्राथमिक शाळांतून २,५०० शिक्षक नेमण्यासाठी ११ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. त्याशिवाय राज्यांत ४२ नव्या माध्यमिक शिक्षणाच्या शाळा काढण्यांत येणार आहेत.

**समुद्राच्या भरतीची शक्ति**—चिलीमध्यें झालेल्या भूकंपा-मुळें जपानवर समुद्राच्या भरतीच्या प्रचंड लाटा कोसळल्या. ह्या लाटांची शक्ति बिकिनी बेटावर अमेरिकेनें टाकलेल्या हैड्रोजन बॉंबसारख्या १,००० हैड्रोजन बॉंम्सइतकी होती, असें मत जपानी शास्त्रज्ञांनीं व्यक्त केलें आहे.

**लोखंडाच्या खाणींचें यांत्रिकीकरण**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्याला लोखंडाच्या मातीचा पुरवठा करणाऱ्या खाणींचें यांत्रिकीकरण करण्यांत येत आहे. ह्या खाणी भिलई-पासून ५५ मैलांवर आहेत. त्यांचें यांत्रिकीकरण करण्याचें काम रशिआच्या मदतीनें चालू आहे. त्यासाठी ६ कोटी रुपये खर्च येईल.

**संस्थानिकांच्या तनख्यांत वाढ**—डांगमधील पूर्वीच्या संस्थानिकांच्या तनख्यांत १५ टक्के वाढ करण्याची शिफारस करण्याची तयारी गुजरातचे मुख्यमंत्री डॉ. जीवराज मेहता ह्यांनीं दाखविली आहे. डांगमधील ५ संस्थानिक व ९ जमात-प्रमुख ह्यांना मिळून सध्यां सालीना १·२५ लाख रुपये तनखा देण्यांत येतो.

**कांबोडिआला देणगी**—भारत सरकारनें कांबोडिआला ५८ गुरें देणगीदाखल दिलीं आहेत. त्यांत ५० गाई आहेत व ८ वळू आहेत. जातिवंत गुरांची पैदास वाढविण्यासाठी पंजाब व आंध्र प्रदेशांतून तीं मुद्दाम निवडण्यांत आलीं आहेत. गेल्या पांच वर्षांत सरकारनें निरनिराळ्या देशांना २५ लाख रुपयांचीं जातिवंत गुरें निर्यात केलीं.

**अमेरिकन तज्ज्ञांची मदत**—खंबायतपासून १५ मैलांवर तारापूर येथें तेलाचा शोध लागला होता. ह्या ठिकाणीं तेलाच्या विहिरी खोदण्यासाठी अमेरिकन यंत्रसामग्री आणण्यांत येत आहे. १५ अमेरिकन तज्ज्ञ लवकरच ह्या ठिकाणीं दाखल होणार असून पुढील काम त्यांच्या देखरेखीखालीं चालेल.

**मॉस्को ते पॅरिस रेल्वे गाडी**—मॉस्को ते पॅरिसपर्यंत थेट प्रवास करणाऱ्या गाडीची व्यवस्था करण्यांत आली आहे. ह्या मार्गावरील पहिली आगगाडी नुकतीच सोडण्यांत आली. पूर्वी मॉस्कोहून पॅरिसला जाण्यास ७९ तास लागत व वाटेंत तीनदां गाडी बदलावी लागे. आतां गाडी बदलावी लागणार नाहीं. सर्व प्रवास ५४ तासांत पुरा करण्यांत येईल.

**क्यूबाची मदत बंद केली**—अमेरिकेकडून क्यूबाला देण्यांत येत असलेली आर्थिक मदत बंद करण्यांत आली आहे. ही मदत मुख्यतः तांत्रिक स्वरूपाची होती. क्यूबामधील नागरी हवाई वाहतुकीसाठी व शेतीच्या विकासासाठी १॥ ते २ लाख डॉलर्सची मदत देण्यांत आली होती. आतां अमेरिकन तंत्रज्ञ निघून जातील व त्यांचे जागीं क्यूबाचे तंत्रज्ञ काम पाहूं लागतील.

**घरें बांधण्याची योजना**—गुजरातच्या हौसिंग बोर्डानें सर्व राज्यभर घरें बांधण्याची एक योजना आंखली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत ती अमलांत आणण्यांत येणार असून तीसाठी १६ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. इमारतीसाठी जमिनी मिळविणें, त्या इमारतींसाठी योग्य करणें, इत्यादि कामें बोर्डच करणार आहे.

**झेकोस्लोव्हाकिआची देणगी**— झेकोस्लोव्हाकिआच्या सरकारनें भारताला ६० लाख रुपयांची देणगी दिली असून त्याचा उपयोग एक एंजिनिअरिंग इन्स्टिटयूट स्थापन करण्याकडे होणार आहे. संस्थेसाठी लागणारी यंत्रसामग्री व तांत्रिक मदत झेक तंत्रज्ञ पुरविणार आहेत. संस्थेसाठी लागणारी जागा अद्याप निवडण्यांत आलेली नाहीं.

**पगार कमी करण्याविरुद्ध तक्रार**—गुजरात राज्यांतील नोकरांच्या पगारांत कपात करण्यांत येणार असल्याच्या वार्ता अहमदाबादमध्यें प्रसृत झाल्या आहेत. गुजरात सरकारनें ह्या बाबत अद्याप निर्णय घेतलेला नाहीं; परंतु दरम्यान सचिवालयांतील कनिष्ठ दर्जाचे कारकून व इतर नोकर ह्यांनीं अर्थमंत्री श्री. देसाई व पंतप्रधान नेहरू ह्यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत.

**लंडन ते न्यूयॉर्क विमानप्रवास**—एअर इंडिआ इंटरनॅशनल ह्या विमानवाहतूक कंपनीनें बोइंग ७०७ विमान वापरून लंडन ते न्यूयॉर्क प्रवासी-वाहतुकीला प्रारंभ केला आहे. सध्यां हा प्रवास आठवड्यांतून तनिदां उलटसुलट दिशेनें करण्यांत येईल. विमानांत १२८ प्रवासी बसण्याची सोय आहे.

**विजापूर येथें विश्रांतिस्थान**—विजापूर हें इतिहासप्रसिद्ध शहर असल्यानें तेथील प्रेक्षणीय स्थळें पाहण्यासाठी हौशी प्रवासी नेहमींच येत असतात. ह्या प्रवाशांपैकीं कमी उत्पन्न असणाऱ्या प्रवाशांची उतरण्याची सोय करण्याकरितां राज्य सरकारनें तेथें एक विश्रांतिस्थान बांधलें आहे. ह्या कामासाठी म्हैसूरच्या सरकारला १ लाख रुपये खर्च आला.

**पुराला आळा घालण्याचे प्रयत्न**—काश्मीर सरकारनें आपल्या हद्दींतून वाहणाऱ्या दोन मोठ्या नद्यांना येणाऱ्या पुरावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक योजना आंखली आहे. ह्या कामासाठी सरकारला ८ कोटी रुपये खर्च येणार आहे. पुराला आळा घालण्यासाठी करावयाच्या बांधबंदिस्तीच्या कामासाठी २ कोटी रुपयांची यंत्रसामुग्री मागविण्यांत येणार आहे.

**सिक्किमला भारताची भेट**—सिक्किममधील गंगटोक येथील तिबेटविषयक संस्थेला भारतातर्फे दोन प्राचीन मूर्ती भेट म्हणून देण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक उपदेश करीत असलेल्या बुद्धाची व दुसरी उभ्या बुद्धाची आहे. ह्या मूर्तींत बुद्ध वर देत आहे. दोन्ही मूर्ती ७ व्या अगर ८ व्या शतकांतील आहेत.

**पं. नेहरूंना मिळालेली भेट**—पं. नेहरू तुर्कस्थानच्या दौऱ्यावर असतांना त्यांना अंकारा येथील एका पत्रपंडितानें एक अंगरखा भेट म्हणून दिला. हा अंगरखा केमाल अतातुर्क ह्यांचा आहे असें त्याचें म्हणणें आहे. तुर्कस्थानमधील विरोधी पक्षाचे पुढारी इस्मेत इनेन्दू ह्यांच्या वतीनें ही भेट देण्यांत आली.

## शेतीचें अर्थशास्त्र : संशोधन समितीचा अहवाल

जमिनीच्या तुकड्यांचें स्वरूप, शेतकी-व्यवसायांत येणारा एकूण खर्च व मिळणारें उत्पन्न, विविध प्रकारच्या पिकांसाठी करावा लागणारा खर्च आणि त्यांचें उत्पादन यांचें प्रमाण आणि शेतकी पद्धतींसंबंधींचे कांहीं प्रश्न यांसारख्या शेती व्यवसायाच्या कांहीं महत्त्वाच्या अंगांसंबंधीं केलेल्या संशोधनाचे निष्कर्ष मध्यवर्ती शेतकी खात्यानें नुकत्याच प्रकाशित केलेल्या 'शेतीचें अर्थशास्त्र' यावरील एका अहवालांत देण्यांत आले आहेत.

नियोजन मंडळाच्या संशोधन कार्यक्रम समितीनें या संशोधनासाठी आर्थिक साह्य केलें. अर्थ आणि आंकडेवारी विभागाच्या देखरेखीखाली मुंबई, पंजाब, उत्तर प्रदेश, प. बंगाल आणि मध्यप्रदेश या निरनिराळया सहा विभागांत हें संशोधन करण्यांत आलें. ह्या विभागांत निरनिराळया प्रकारची व वेगवेगळे गुणधर्म असणारी आणि विविध पिकें निघणारी जमीन निवडण्यांत आली होती.

ह्या संशोधनाच्या आणि तंत्राच्या स्थूल स्वरूपाबाबत समितीनें मार्गदर्शन व सूचना केल्या. श्री. धनंजयराव गाडगीळ हे ह्या समितीचे अध्यक्ष होते.

पहिल्या वर्षांत मिळालेल्या माहितीच्या आधारें अहवाल तयार करण्यांत आला असला तरी शेतकी संशोधकांना व शेतकऱ्यांना ही माहिति अतिशय उपयुक्त ठरेल.

---

## मुदत पूर्ण होऊनहि न वटविलेल्या राष्ट्रीय रोख्यांवर पांच वर्षेपर्यंत व्याज मिळणार

मुदत पूर्ण झाल्यानंतरहि न वटविलेल्या राष्ट्रीय बचत रोख्यांच्या बाबतींत एकूण रकमेवर त्यानंतरच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी ३॥ टक्के दरानें व्याज देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. हे रोखे वटविण्यांत येतील त्या वेळीं या व्याजासुद्धां एकूण रक्कम देण्यांत येईल.

एप्रिल महिन्यांत एकूण ५·७० कोटी रु. चे प्राईज बॉण्ड विकले गेले. येत्या दि. १ सप्टेंबर रोजीं मुंबई येथें पहिला लॉट काढण्यांत येईल. ह्यावर देखरेख करण्यासाठी प्रतिष्ठित व्यक्ति असलेली एक समिति नेमण्यांत येत आहे. देशांत १,१५,००० बचत गट संघटित करण्यांत आले असून त्यांचे २७ लाखांवर सदस्य आहेत. यांपैकी १,६०० गटांतील सुमारें ६३,००० नोकरांनीं आपल्या पगारांतून परस्पर पैसे कापून टपाल-कचेऱ्यांकडे पाठविण्यास संमति दिलेली आहे.

---

## 'बिस्किटांसाठी आय. एस. आय.'

भारतांतील सात बिस्किट कारखानदारांना त्यांच्या बिस्किटांसाठी आय. एस. आय. हें प्रशस्तिचिन्ह वापरण्यासाठी इंडियन स्टँडर्डस इन्स्टिटयूशननें अलिकडेच परवाने दिले आहेत. ज्या बिस्किटांच्या पुड्यांवर किंवा खोक्यांवर हें प्रशस्तिचिन्ह असतें त्यांतील बिस्किटें खुसखुशीत, चांगलीं भाजलेलीं व आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या पदार्थांच्या भेसळीपासून मुक्त असल्याची ती हमीच असते. परवाने देतांना संबंधित कारखान्यांत आवश्यक त्या दर्जाचा माल तयार होतो अशी खात्री करूनच हे परवाने देण्यांत येतात आणि चिन्ह असलेल्या मालाच्या नमुन्यांची वारंवार चांचणी घेण्यांत येते.

# अर्थ

बुधवार, ता. ८ जून, १९६०

संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे




## स्वस्त रेडिओ सेट्स निर्माण करण्याची योजना

भारत सरकारच्या दोन संबंधित खात्यांनीं व रेडिओ तयार करणाऱ्या कारखान्यांनीं मिळून स्वस्त रेडिओ सेट्स तयार करण्याची एक योजना आखली आहे. संकल्पित रेडिओची किंमत रु. १२५ असेल अशी वार्ता आहे. भारतानें रेडिओ तयार करण्याच्या बाबतींत गेल्या कांहीं वर्षांत चांगली प्रगति केलेली आहे. १९४७ सालीं देशांतील रेडिओंचें वार्षिक उत्पादन सुमारें ३,००० च होतें. १९५९ सालामध्यें रेडिओ सेट्सचें उत्पादन २ लाखांच्या घरांत गेलेलें आहे. ह्या धंद्याचें वाढतें उत्पादन मागणीच्या मानानें अजूनहि कमीच आहे. देशांत घरगुती वापरासाठी घेण्यांत येणाऱ्या रेडिओ परवान्यांची संख्या सुमारें १६ लाख आहे. हा आंकडा मोठा वाटला तरी लोकसंख्येच्या मानानें तो अत्यल्पच म्हटला पाहिजे. रेडिओच्या प्रसाराला अद्याप पुष्कळच वाव आहे हें त्यावरून दिसून येतें. रेडिओच्या प्रसाराला मुख्य अडचण अशी सांगण्यांत येतें कीं त्याच्या किंमती लोकांना परवडणाऱ्या नाहींत. ह्या बाबतींत सरकारनें आतां पुढाकार घेतल्याचें दिसत आहे. पण, रु. १२५ देऊन रेडिओ घेणारे लोक तरी वाढत्या प्रमाणांत मिळतील किंवा नाहीं अशी शंका येण्यासारखी आहे. रेडिओ सेटसचा प्रचार मुख्यत: खेडोपाडीं होणें आवश्यक आहे. मागें एकदां ५० रुपायांना रेडिओ देण्याची शक्यता अजमावण्यांत आली होती. तें शक्य झालेलें दिसत नाहीं. रेडिओचे सर्व भाग जेव्हां भारतांत तयार होऊं लागतील, तेव्हांच इतका स्वस्त रेडिओ तयार होऊं शकेल.

---

## राजस्थानांतील छोट्या उद्योगधंद्यांच्या अडचणी

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत राजस्थानांतील छोट्या उद्योगधंद्यांची परिस्थिति कशी होती हें पाहण्यासाठी एक अभ्यास मंडळ नेमण्यांत आलें होतें. अभ्यास मंडळानें त्यांची तपासणी करून असा निष्कर्ष काढला आहे, कीं ह्या धंद्यासाठी काढण्यांत आलेलीं शिक्षण केंद्रें, मध्यवर्ती वर्कशॉप आणि इतर आनुषंगिक संघटना ह्यांचें काम अपेक्षेप्रमाणें समाधानकारक झालेलें नाहीं. योजनेच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षांत छोट्या उद्योगधंद्यांची प्रगति अगदींच बेताची झाली. कारण, राज्य-सरकारच्या उद्योगखात्यांत पुरेशीं माणसें नव्हतीं व काम करण्यास लागणारीं साधनेंहि नव्हतीं. तिसऱ्या वर्षांत कामाला प्रारंभ होऊन थोडीबहुत गतिहि आली. तरीपण योग्य त्या साधनांची टंचाई भासतच होती. तांत्रिक शिक्षण घेतलेल्या माणसांची टंचाई तर होतीच; त्याशिवाय उपकरणांच्या खरेदीच्या बाबतींत अडचणी आल्या. कांहीं केंद्रांतून शिक्षण घेऊन तयार केलेलीं माणसेंहि मिळालीं. पण त्यांना पुरेसें व्यावहारिक शिक्षण योग्य रीतीनें देण्यांत आलेलें नव्हतें. राजस्थानांत स्थापन करण्यांत आलेल्या औद्योगिक वसाहतींची प्रगतीहि अतिशय सावकाश होत असल्याचें आढळून आलें. सरकारच्या निरनिराळ्या खात्यांत जो एकसूत्रीपणा असावा लागतो त्याचा अभाव असल्यामुळें औद्योगिक वसाहतींवर विपरीत परिणाम झाला. उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठ्याच्या बाबतहि असमाधान-कारक परिस्थिति आढळून आली. उदाहरणार्थ, पोलादाचा पुरेसा पुरवठा होऊं शकत नव्हता. राजस्थानांतील छोट्या उद्योगधंद्यांच्या वाढीला लागणारी औद्योगिक शक्तीहि पुरेशी उपलब्ध नव्हती.

---

## चीनमधील उत्पादनाला लष्करी दिशा

कम्युनिस्ट चीनमधील पुढाऱ्यांच्या अलीकडील भाषणावरून चीन आपल्या औद्योगिक उत्पादनाला लष्करी वळण लावण्याचा प्रयत्न करीत आहे असें दिसतें. त्याचबरोबर, लोकांच्या मनो-वृत्तीलाहि युद्धोत्सुक दिशा देण्याचा प्रयत्न होत आहे. पण चीनमधील उद्योगधंद्यांची प्रगति चांगल्या दर्जाचें लष्करी उत्पादन करूं शकेल किंवा नाहीं, हा प्रश्न आहे. शिवाय लष्कराला लागणारें सामान पुरेशा प्रमाणांत तयार होऊं शकेल किंवा नाहीं हाहि प्रश्न आहेच. आज चीनमधील यंत्रसामग्री उत्पन्न करणारे उद्योगधंदे बाल्यावस्थेंत आहेत. खुद्द चीनमधील कम्युनिस्ट पक्षांतच ह्याबद्दल टीका करण्यांत येत आहे. सध्यां चीनमध्यें जो कांहीं यंत्रोद्योग आहे तो रशिआच्या मदतीनें उभारण्यांत आला आहे. रशिआच्या तांत्रिक साह्यामुळेंच तो स्थापन करणें शक्य झालें आहे. चीनच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत अवजड यंत्रसामग्री तयार करण्यासाठी प्रयत्न करण्यांत येत आहेत. रशियन तंत्रज्ञांच्या मदतीनें १०० नव्या अवजड यंत्रांच्या कारखान्यांची उभारणी करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें, कांहीं जुन्या कारखान्यांचा विस्तारहि करण्यांत आला आहे अगर येत आहे. १९४९ सालीं चीनमध्यें कम्युनिस्ट सरकार स्थापन झालें. त्या वेळीं लहान अगर मोठ्या यंत्रसामग्रीच्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्या अवघी २ लाख होती. आतां त्यांची संख्या ३० लाखांवर गेली आहे. चीनचें औद्योगीकरण एक प्रकारच्या सक्तीनें करण्यांत येत आहे. त्यांतहि औद्योगीकरणाला लष्करी वळण देण्याचा प्रयत्न सतत करण्यांत आला, तर चीनच्या अर्थव्यवस्थेला तें झेपेल काय हाच खरा प्रश्न आहे.

---

## ऐतिहासिक नाण्यांची चोरी

विजापूर येथील पुराण वस्तु संग्रहालयांत शिरून चोरांनीं ३० सोन्याचीं नाणीं चोरून नेलीं. हीं नाणीं मोंगल, आदिलशाही व विजयानगर राज्यांचीं असून त्यांची किंमत सुमारें ३,५०० रु. भरेल.

---

## शेतकऱ्यांना लागणाऱ्या मालाचें वांटप

म्हैसूर राज्य सरकारनें म्हैसूर स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटीची स्थापना केली आहे. शेतकऱ्यांना लागणारीं रासायनिक खतें, लोखंड व पोलादाचा माल व इतर वस्तु ह्यांचें वांटप सहकारी संस्थांच्या मार्फत करण्याच्या हेतूनें वरील संस्था स्थापन करण्यांत आली आहे. शेतकऱ्यांना लागणारा माल मिळविण्याचे प्रयत्नहि संस्थेतर्फे करण्यांत येतील. संस्थेची मुख्य कचेरी बंगलोर येथें राहणार आहे. पण प्रत्यक्ष वांटपाचें काम मात्र प्रत्येक तालुक्यांतील सहकारी मार्केटिंग सोसायटीकडे व प्रत्येक खेड्यांतील प्राथमिक सहकारी संस्थेकडे सोंपविण्यांत येणार आहे. आतांपर्यंत हें काम राज्य सरकारच्या शेतकी खात्यामार्फत करण्यांत येत असे. पण शेतकी खात्याकडे हें काम दिल्यामुळें शेतीचें कारभारविषयक काम व तांत्रिक सल्लामसलतीचें काम खात्याकडून नीट होत नाहीं असा अनुभव सरकारला आला. त्यामुळें खात्याकडून वरील काम काढून घेऊन सहकारी संस्थांमार्फत तें उरकण्याचें सरकारनें ठरविलें आहे. सहकारी संस्थांना आपलें काम नीट पार पाडतां यावें म्हणून सरकार सर्व प्रकारचें साह्य देणार आहे. डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरच्या तोलाचा एक अधिकारी निदान एक वर्षभर बंगलोर येथील संस्थेला मार्गदर्शन करील व सल्लामसलत देईल. त्याचा खर्च राज्य सरकार स्वतःच सोसेल. त्याशिवाय शेतकी-खात्याच्या मालवाहू मोटारीहि नव्या संघटनेच्या दिमतीला दिल्या जातील. बंगलोर येथील संस्थेला आपल्या मालकीच्या मालमोटारी घेतां याव्या म्हणून अल्प व्याजाच्या दरानें सरकार कर्जहि देणार आहे. सहकारी सोसायट्यांमार्फत शेतकऱ्यांना लागणारा माल पुरविण्याचा हा प्रयोग यशस्वी होईल अशी अपेक्षा आहे.

## अकोल्याची लक्ष्मी बँक गुंडाळण्यांत आली

मुंबई हायकोर्टानें लक्ष्मी बँक गुंडाळण्यांत यावी, असा हुकूम दिला आहे. ऑफिशिअल लिक्विडेटर श्री. दलाल ह्यांना प्रोव्हिजिनल लिक्विडेटर नेमण्यांत आलें आहे. रिझर्व्ह बँकेनें केलेल्या अर्जावरून हायकोर्टानें हा हुकूम केला. रिझर्व्ह बँकेनें आपल्या अर्जांत म्हटलें होतें, कीं २० मे, १९६० रोजीं लक्ष्मी बँकेचीं देणीं २,५६,००,००० रु. एवढीं होतीं आणि जिंदगी ७३·७३ लक्ष रु. रोख व रोखे आणि १८·५६ लक्ष रु. इतर येणीं, अशीं होतीं. बँकेच्या हिशेबांत जेवढी कॅश दाखविलेली होती, तिच्यापेक्षा प्रत्यक्ष रोख रक्कम ४० पैकी २२ शाखांत मिळून ५५·१७ लक्ष रुपयांनीं कमी होती. लक्ष्मी बँक चालू राहणें ठेवीदारांच्या हिताचें नाहीं असें रिझर्व्ह बँकेचें मत झालें. बँकेच्या प्रमुख अधिकाऱ्यांनीं अनुचित कृत्यें केलीं असल्याचाहि रिझर्व्ह बँकेचा दावा आहे.

प्रोव्हिजिनल लिक्विडेटर नेमण्यापूर्वी बँकेला नोटीस द्यावी लागते. पण वरील कारणें पुरेशीं गंभीर असल्याकारणानें कंपनी कायद्याच्या ४५० (२) कलमाप्रमाणें नोटिशीची आवश्यकता नाहीं असें ठरवून, हायकोर्टानें वरीलप्रमाणें हुकूम दिला. लक्ष्मी बँकेची स्थापना १९२८ सालची असून तिच्या ४० शाखा आहेत.

## स्टेट बँकेचे नवे व्हाइस-चेअरमन, प्रा. कर्वे

प्रा. द. गो. कर्वे ह्यांची भारत सरकारनें स्टेट बँकेच्या व्हाइस चेअरमनचे जागीं दोन वर्षांकरितां नेमणूक केली आहे. स्टेट बँकेच्या सेंट्रल बोर्डाच्या शिफारसीवरून आणि रिझर्व्ह बँकेचा सल्ला घेऊनच ही नेमणूक करण्यांत आली आहे.

## सोन्याच्या चोरट्या आयातींत विमानांतील नोकरवर्गाचा हात

हाँगकाँगमध्यें सोन्याची खरेदी करून आणि भारतांत त्याची चोरून आयात करून कलकत्ता, मुंबई व दिल्ली येथें तें विकण्याचा 'धंदा' तेजींत आहे. कारण, खरेदीच्या किंमतीच्या दुप्पट किंमतीला भारतांत सोनें विकतां येतें. भारत आणि हाँगकाँग येथें हा व्यवहार करणाऱ्या एका मोठ्या, अड्डल टोळीनें ब्रिटिश ओव्हरसीज एअरवेज कॉर्पोरेशनच्या कित्येक स्टुअर्डसचा सोन्याच्या वाहतुकीसाठी उपयोग करण्यांत यश मिळविलें होतें; आतां ह्या वाहतुकीस आळा घालण्यांत आला आहे, असें बी. ओ. ए. सी. नें जाहीर केलें आहे. जानेवारी, १९५८ पासून आतांपर्यंत त्या कॉर्पोरेशननें ४९ स्टुअर्ड, एक नॅव्हिगेटर आणि एंजिनिअर, ह्यांना बडतर्फ केलें असून २६ स्टुअर्ड व एक एंजिनिअर ह्यांचे करार रद्द केले आहेत.

## धवलगिरीची नवी उंची

१३ मे रोजीं स्विस गिर्यारोहकांनीं धवलगिरि शिखरावर आरोहण केलें, तेव्हां त्यांच्याजवळील अल्टिमीटर यंत्रानें २६,९७५ फूट उंचीची नोंद केली. सध्या त्या शिखराची उंची २६,७९५ फूट मानण्यांत येते. म्हणजे, त्यांत १८० फुटांची वाढ होईल. ही मान्य केली गेल्यास, धवलगिरि जगांतील सहाव्या अनुक्रमाचें शिखर गणलें जाईल; सध्यां त्याचा अनुक्रम सातवा आहे.

**नगर जिल्ह्यांतील सहकारी चळवळ**—सहकारी चळवळीच्या बाबतींत अहमदनगर जिल्ह्यानें लक्षांत भरण्यासारखें यश मिळविलें आहे. ३१ मार्च, १९६० अखेर जिल्ह्यांतील सहकारी संस्थांच्या सभासदांची संख्या ९५,००० पर्यंत गेली होती. जिल्ह्यांतील १,३१९ खेड्यांपैकी ९८ टक्के खेड्यांनीं १९५९ अखेर सहकारी चळवळींत भाग घेतलेला होता.

**रशिअन ग्रंथकर्त्याचा मृत्यु**—'झिवॅगो' ह्या प्रसिद्ध कादंबरीचे लेखक मि. बोरीस पास्टरनॅक आपल्या वयाच्या ७० व्या वर्षी काळपुळीच्या रोगानें मरण पावले. त्यांच्या वरील कादंबरीला वाङ्मयाचें नोबेल पारितोषिक मिळालें होतें. पण खुद्द रशिआंत कादंबरीविषयीं प्रतिकूल टीका झाल्यामुळें त्यांनीं तें नाकारलें होतें.

महाराष्ट्रांतील व्यापारी शिक्षणाची आद्यसंस्था

**डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स**

(स्थापना १९१८)

**७१७ बुधवार पेठ, जिजामाताबागेजवळ, पुणें २.**

टेलिफोन नं. २३६०

नवीन वर्षाकरितां सोमवार दि. २० जून १९६० पासून उघडेल. जी. सी. डी., डी. कॉम्., जी. डी. सी. ॲन्ड ए., कॉस्टिंग डिप्लोमा (ए. आय्. सी. डब्ल्यू. ए.) अकौन्टन्सी, शॉर्टहँड, टाइपरायटिंग आणि पुणें विद्यापीठाचा एक्स्टर्नल प्री-डिग्री कॉमर्स कोर्स व एक्स्टर्नल बी. कॉम्. डिग्री कोर्स.

**सकाळ संध्याकाळचे वर्ग**

एस्. एस्. सी., मॅट्रिक, अंडरग्रॅज्युएट्स् व ग्रॅज्युएट्स् यांना योग्य असे अभ्यासक्रम.

**माहितीपत्रक मोफत मिळेल.**

## शहरांतील दरिद्री कुटुंबांची वाढ

शहरांची झपाट्यानें वाढ कशी होत जाते त्याचें अचूक व स्पष्ट चित्र नजरेसमोर असावें या हेतूनें नियोजन मंडळानें सुमारें चार वर्षांपूर्वी निरनिराळया विद्यापीठांतील संशोधन विभागांमार्फत यासंबंधीं पाहणीचा व अभ्यासाचा उपक्रम हातीं घेतला. मुंबई, पुणें, मद्रास, जयपूर, कलकत्ता, आग्रा, अलाहाबाद, अलिगड, अमृतसर, बडोदें, सुरत, कटक, दिल्ली, गोरखपूर, हैद्राबाद, हुबळी, जमशेदपूर कानपूर, लखनौ व विशाखापट्टणम् या २१ शहरांची आर्थिक व सामाजिक दृष्ट्या नमुन्यादाखल पाहणी करून मिळालेल्या माहितीचा अधिक अभ्यास करण्यांत आला. ही पाहणी करतांना मुख्यत्वें या शहरांची झपाट्यानें वाढ होण्यास कोणत्या गोष्टी कारणीभूत झाल्या असाव्यात हें जाणून घेण्याचा हेतु होता. हें करतांना विशेषतः उपलब्ध व्यवसायांच्या स्वरूपांत फेरबदल, उत्पन्नांचें विभाजन, स्थलांतर, घरांचा प्रश्न आणि सामूहिक स्वरूपाच्या सुखसोयींत वाढ, या गोष्टींची पाहणी करण्यांत आली.

आपण शहरीकरणासंबंधीं बोलतों तेव्हां निरनिराळया शहरांची वाढ निरनिराळया कारणांमुळें कमी-अधिक वेगानें होत असते ही गोष्ट आपण लक्षांत घेतली पाहिजे. सामान्यतः (१) स्थानिक व्यापार आणि बाजारपेठा, (२) राज्यकारभाराचीं केंद्रें व सांस्कृतिक महत्त्वाचीं ठिकाणें (३) व्यापारी, विशेषतः परदेशांशीं चालणाऱ्या व्यापाराचीं केंद्रें आणि औद्योगिक शहरें अशा विविध कारणांनीं शहरांची वाढ होत असते. १९ व्या शतकाच्या अखेरीं अखेरीपर्यंत तरी भारतांतील बहुतेक शहरांची वाढ यांपैकी पहिल्या दोन कारणांमुळें मुख्यत्वें झालेली आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांशीं व्यापार वाढूं लागल्यावर कांहीं शहरांची अफाट वाढ झाली. औद्योगिक शहरें त्या मानानें अलिकडेच वसलेलीं आहेत. आग्रा, अलाहाबाद, बडोदें, लखनौ किंवा पुणें या शहरांची जी विशेष वाढ झाली ती मुख्यत्वें कारभारात्मक आणि सांस्कृतिक कार्यांचीं केंद्रें म्हणून, तर मुंबई, कलकत्ता आणि मद्रास या ठिकाणीं व्यापाराची भरभराट झाल्यानें त्यांची वस्ती अतोनात वाढली. अर्थात् कालान्तरानें त्यांचें औद्योगिक दृष्ट्या असलेलें महत्त्व लक्षांत येऊन त्या दृष्टीनेंहि वस्ती वाढत गेली. जमशेदपूर किंवा विशाखापट्टणम् यांची वाढ अल्प मुदतींत झाली ती तेथील नव्या उद्योगधंद्यांमुळें. हाच अनुभव आतां भिलाई, रूरकेला व दुर्गापूर या पोलाद कारखान्यांच्या शहरांबाबतींत येईल. किंबहुना या पुढील काळांत बहुतांशीं औद्योगीकरण आणि आर्थिक व्यवहाराचें आधुनिकीकरण यांमुळें शहरांची वाढ होईल. अर्थात् हें शहरीकरण आपण योजनांवर जितका पैसा खर्च करूं त्या प्रमाणांतच होत जाईल. १९४७ मध्यें देशाची फाळणी झाल्यानें कांहीं थोड्या शहरांत स्थलांतरितांची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्यामुळें तेथील वस्ती वाढली. ही वाढ नैसर्गिक स्वरूपाची म्हणतां येण्यासारखी नाहीं. अर्थात् ते ज्या निरनिराळया विभागांत पसरले त्या त्या भागांत त्याचे आर्थिक व इतर परिणाम झालेच.

सामान्यतः खेड्यांतील लोक शहरांकडे वळतात असें असलें तरी त्याचा बारकाईनें विचार केल्यास एखाद्या मोठ्या शहराच्या प्रभावाच्या परिसरांत असलेल्या खेड्यांतील वा लहान गांवांतील लोकच त्या शहरांत बहुसंख्येनें येतात असें दिसून येतें. मोठ्या शहरांतून बाहेर जाणारे लोक त्याहून मोठ्या अशा दूरवरच्याहि शहरांकडे जातात असें दिसून येतें. शहरांत येणाऱ्या लोकांची वयें, शिक्षण व व्यवसाय या दृष्टीनें पाहणी करणें उद्बोधक ठरेल. शहरांत ज्या स्वरूपाचे व्यवहार चालतात व वाढण्याची शक्यता असते त्यावरच त्या शहरांत कोणत्या प्रकारची वस्ती येईल हें अवलंबून राहतें. उदाहरणार्थ, व्यापारी बाजारपेठांचा उदय झाल्यावर खेड्यांतील व्यापारीवर्ग अशा नव्या बाजारपेठांकडे आकर्षिलें जाणें स्वाभाविकच होतें. शिक्षणाच्या सोयी वाढल्याबरोबर व्यावसायिक वर्ग आणि मध्यमवर्ग शहरांत राहणें पसंत करूं लागला. तथापि अलिकडील काळांत विशेषतः नव्या उद्योगधंद्यांच्या विकासाचा विचार करून लोक अशा ठिकाणांकडे राहण्यास जातात असें दिसतें. साहजिकच केवळ मजुरी करणाऱ्यांपेक्षा उमेदवार, मॅट्रिक झालेला विद्यार्थी, कसबी कारागीर, यांस अशा शहरांत वाव अधिक मिळतो.

तथापि पाहणी केलेल्या शहरांत असलेली बेकारी आणि अपुरी रोजगारी यांचा विचार केला तर घरांची तीव्र टंचाई व इतर सामाजिक सुखसोयींचा अभाव असूनहि या शहरांत येणाऱ्यांना तेथें हमखास कामधंदा मिळेल अशी फारशी शक्यताहि दिसत नाहीं असेंच आढळून आलें. थोडेंसें शिक्षण झालें किंवा कांहीं कला जवळ असली कीं खेड्यांतील तरुणवर्ग शहरांकडे वळतो. यामुळें ग्रामीण विभागास संभाव्य नेत्यांना मुकावें लागतें व त्या प्रमाणांत त्या भागांचें नुकसान होतें.

आधुनिक काळांत निरनिराळया गोष्टींच्या प्रभावानें पूर्वींच्या काळांतील खेड्यांतील स्वयंपूर्ण आर्थिक घडी पार विसकटली. शिकलेल्या, कलेचें ज्ञान घेतलेल्या आणि महत्त्वाकांक्षी लोकांना खेड्यांत योग्य ती संधीच नसल्यानें तें तेथून हलूं लागले. आर्थिक विकास आणि औद्योगीकरण यामुळें ग्रामीण आणि शहरी विभागांतील उत्पन्न, रोजगार आणि राहणी यांतील अंतर अधिकच वाढलें. तथापि अलिकडील कांहीं वर्षांत भारताच्या विकास योजनांचा एक भाग म्हणून ग्रामीण विभागांच्या विकासावर आणि खेड्यांच्या नवरचनेवर विशेष भर दिला जात आहे. शेतकी उत्पादनाच्या पद्धति बदलून आणि इतर कार्यें मोठ्या प्रमाणावर सुरू करून या कामास अधिक बळकटी व वेग आणला पाहिजे. सहकारी चळवळीची कांस धरून कार्यक्षम आणि बहुविध स्वरूपाची आर्थिक घडी या भागांत बसविणें हाच शहरी आणि ग्रामीण विभागांतील विषमता दूर करण्याचा यशस्वी तोडगा होय. तथापि ग्रामीण भागाच्या पुनर्रचनेचा प्रश्न अलगपणें न सोडवितां सबंध विभागाचा विकास साधतांना त्याचाच एक अविभाज्य घटक या दृष्टीनें हा प्रश्न हाताळला पाहिजे.

मोठ्या शहरांतील जवळजवळ $\frac{3}{4}$ लोकसंख्या कामगार आणि पगारी नोकर यांचीच असते. साहजिक घरें, पाणी, आरोग्य व शिक्षण यांसारख्या सोयींकरतां त्यांना नगरपालिकांवर अवलंबून राहावें लागतें. शहरांच्या विकासाबरोबरच रोजगाराची संधि, शिक्षण, घरें, आरोग्याची सोय, पाणीपुरवठा यांसारख्या सोयींत त्या प्रमाणांत वाढ न झाल्यास अशा प्रत्येक शहरांतील लोक वाढत्या प्रमाणांत अधिक दरिद्री बनत जातील. पुणें शहराची १९५७ मध्यें पाहणी केली तेव्हां माहिती संकलित केलेल्या कुटुंबांपैकीं ६५ टक्के कुटुंबें 'दरिद्री' या वर्गाच्याहि खालींच असल्याचें दिसून आलें. १९५४ मधील पाहणींत हेंच प्रमाण सुमारें ७० टक्के होतें. निराश्रित सदराच्या खालच्या पातळीवर असलेल्यांची संख्या १९३७ मधील १५ टक्क्यांवरून १९५४ मध्यें वाढून २५ टक्के झाली. खास उपाय योजले नाहींत तर शहरी आणि ग्रामीण विभागांतील अलगता वाढण्याचाच संभव.

### रिझर्व्ह बँकेचा १९५९ चा वार्षिक अहवाल

भारतांतील बँकिंग व्यवसायाची परिस्थिति व प्रगति याविषयींचा वार्षिक अहवाल रिझर्व्ह बँकेनें नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यावरून दिसून येतें कीं, या वर्षांत कमर्शियल बँकांकडील ठेवींत २५३ कोटी रुपयांनीं वाढ होऊन हा आंकडा १,८३६ कोटी रुपयांवर जाऊन एक उच्चांक प्रस्थापित झाला. १९५८ मध्यें ठेवींत २१६ कोटी रुपयांची वाढ झाली होती. मागील वर्षाप्रमाणेंच या वर्षांतील बऱ्याचशा ठेवी मुदतीच्या ठेवीच होत्या. मुदतीच्या ठेवींचा आंकडा १९५८ पेक्षा ९ कोटी रुपयांनीं म्हणजे एकूण २३४ कोटी रु. नीं वाढला. १९५८ मध्यें डिमांड डिपॉझिटस्मध्यें १० कोटी रु. ची घट झाली होती. त्याउलट १९५९ मध्यें डिपॉझिटस् १९ कोटी रुपयांनीं वाढलें.

या वर्षांत शेड्यूल्ड बँकांच्या कर्जांत ९१ कोटी रुपयांची वाढ झाली. १९५८ मध्यें ११ कोटी रुपयांनीं वाढ झाली होती. औद्योगिक विकासाकरितां देण्यांत आलेल्या कर्जांची रक्कम ऑक्टोबर १९५९ ला संपलेल्या वर्षांत २० कोटी रु. नीं वाढली. गतवर्षीं १४ कोटी रुपयांनीं वाढली होती. या वर्षांतील किंमतमान वाढण्याची प्रवृत्ति लक्षांत घेऊन रिझर्व्ह बँकेस कर्जविषयक धोरण अतिशय दक्षतापूर्वक आंखावें लागलें.

या वर्षांत रिझर्व्ह बँकेनें ६६ कोटी रु. किंमतीच्या सरकारी रोख्यांची विक्री केली. मागील वर्षाचा हा आंकडा ११७ कोटी रु. होता. ५ कोटी रु. व त्याहून अधिक ठेवी असलेल्या २५ मोठ्या भारतीय शेड्यूल्ड बँकांच्या १९५९ च्या नफ्या-तोट्याचें पत्रक पाहतां त्यांच्या निव्वळ नफ्याच्या परिस्थितींत किंचित् सुधारणा झाली असल्याचें दिसून येतें. या वर्षांत या बँकांचें एकूण उत्पन्न ७·८ कोटी रु. नीं वाढून ६९·९ कोटी रु. वर गेलें तर एकूण खर्च ७·५ कोटी रु. नीं वाढून ६२ कोटी रु. वर गेला. यावरून या बँकांचा निव्वळ नफा ०·३ कोटी रु. नीं वाढून ७·९ कोटी रु. वर गेल्याचें दिसून येतें. १९५७ व १९५८ चे हेच आंकडे अनुक्रमें ८·४ व ७·६ कोटी रु. असे होते.

### स्टेट बँकेची ४०० वी शाखा

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखांची वाढ करण्याच्या योजनानुसार उघडण्यांत येणारी बँकेची ४०० वी शाखा दि. १ जून रोजीं मध्यवर्ती अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई यांच्या हस्तें उघडण्यांत आली. उत्तर प्रदेश राज्यांतील मुझफरनगर जिल्ह्यांतील कैराणा खेड्यांत ही शाखा आहे.

### हायकोर्टांतील तुंबलेलीं कामें; बाकी ८०% नें कमी झालीं

हायकोर्टांतील १९५६ मधील व त्यापूर्वी बाकी दाव्यांपैकी ८०% दावे १९५९ अखेर निकालांत काढण्यांत आले आहेत. बाकी दाव्यांची संख्या १,७०,००० वरून ३७,९३४ वर आली. म्हणजे ती १,३२,०६६ नीं उतरली. दिवाणी दाव्याचा निकाल कमाल दोन वर्षांत आणि फौजदारी दाव्याचा निकाल सहा महिन्यांत लावण्यांत यावा, अशी राज्यांच्या कायदा-मंत्र्यांनीं सप्टेंबर, १९५७ मध्यें शिफारस केली होती. हायकोर्टांचे न्याया-धीश वाढवून, सुट्ट्या कमी करण्यांत आल्या. एप्रिल १९६० अखेर वेगवेगळ्या हायकोर्टांत मिळून ३८ जादा न्यायाधीश नेमण्यांत आले. बहुतेक सर्व हायकोर्टांनीं कामाचे दिवस वाढवून २१० केले. त्यामुळें तुंबलेलें काम निकालांत निघूं शकलें.


### विदेशी फर्म्समधील जागांचें हिंदीकरण

भारत सरकारचें व्यापारखातें आणि भारतांतील विदेशी फर्म्स ह्यांचेमध्यें, त्या फर्म्समधील वरिष्ठ जागांचें हिंदीकरण अधिक गतीनें घडवून आणण्याबाबत वाटाघाटी चालू आहेत. श्री. टी टी. कृष्णम्माचारी व्यापारमंत्री असतांना, त्यांनीं ह्या धोरणास प्रथम चालना दिली. दरमहा १,००० रुपयांपेक्षा अधिक पगाराच्या हिंदी नोकरांचें प्रमाण १९५६ मध्यें ४१·६% होतें, तें १९५९ मध्यें ५९·७% झालें आहे. १,००० रु. खालील पगाराच्या ९६% जागांवर हिंदी लोक आहेत.

---

**गुजरातचें औद्योगीकरण**—गुजरात राज्याच्या औद्योगीकरणाला जोराची चालना देण्याच्या दृष्टीनें राज्यसरकारचें उद्योगखातें उद्योगधंद्याच्या गरजांसंबंधीं आंकडेवार माहिती गोळा करीत आहे. त्याचप्रमाणें नव्या उद्योगधंद्यांच्या स्थापनेविषयींहि माहिती मिळवत आहे. गुजरातच्या औद्योगीकरणाला येणाऱ्या अडथळ्यांत विजेच्या शक्तीची टंचाई हा प्रमुख अडथळा आहे.

**साखर–कामगारांना बोनस**—बेलापूर शुगर कंपनी आणि अहमदनगर साखर-कामगार संघ ह्यांच्यांत बोनसबद्दल करार करण्यांत आला आहे. कंपनीनें १९५८–५९ सालासाठी ४ लाख रुपयांचा बोनस वांटण्याचें ठरविलें आहे. त्याप्रमाणें कंपनीच्या हरीगांव येथील साखर-कारखान्यांतील २,५०० नौकरांना बोनस वांटण्यांत येणार आहे.

## उत्पादन-बोनसची योजना ट्रायब्यूनलच्या कक्षेंत येते काय ?

दि टिटाघर पेपर मिल्स कं. लि. नें १९४९ मध्यें एक उत्पादन-बोनस योजना सुरू केली. तिला कामगार संघाची संमति होती आणि १९४५-४६ व १९४६-४७ च्या बोनसला योग्य आधार म्हणून इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलनें त्यास मान्यता दिली होती. १९५३ मध्यें, कामगारांनीं १९५०-५१ आणि १९५१-५२ साठी नफा-बोनसची मागणी केली आणि उत्पादन-बोनस योजनेंत दुरुस्ती करून मागितली. कामगारांना उत्पादन बोनस मिळत आहे, म्हणून इं. ट्रायब्यूनलनें युनियनची मागणी फेटाळली. तेव्हां युनियननें अपील केलें. लेबर ॲपेलेट ट्रायब्यूनलनें १९५०-५१ साठी मागणी तांत्रिक कारणासाठी नामंजूर केली, पण १९५१-५२ साठी एक महिन्याचा बोनस देवविला आणि उत्पादन-बोनसच्या योजनेंत फरक केला. कंपनीनें सुप्रीम कोर्टाकडे अपील केलें.

उत्पादन-बोनस, ही कंपनीच्या खुषीची बाब आहे; ती औद्योगिक तंट्यांचा विषय होऊं शकत नाहीं; त्या योजनेच्या अंमलबजावणींत कंपनी कावेबाजपणा करीत नाहीं, तोंवर ट्रायब्यूनलनें मध्यें पडूं नये, असें कंपनीतर्फे सांगण्यांत आलें. "उत्पादन-बोनस अधिक उत्पादनास चालना देण्यासाठींच आहे; तेव्हां तो जादा वेतनाचाच एक प्रकार आहे; उत्पादन-बोनस योजना इंडस्ट्रियल कोर्टाच्या कक्षेंत येते, कारण नोकरीच्या अटीचा तो एक प्रकार आहे," असें मत सुप्रीम कोर्टानें व्यक्त केलें. अशी योजना अंमलांत आणण्याबद्दलचा तंटा कक्षेंत येईल किंवा नाहीं, ह्याचा सुप्रीम कोर्टानें विचार केला नाहीं; पण अंमलांत असलेल्या योजनेंत त्याला हस्तक्षेप करतां येईल; तथापि ह्या योजनेंत बदल करण्यास सबळ कारण पाहिजे, असें सुप्रीम कोर्टानें नमूद केलें.

टिटाघर कंपनीच्या योजनेंत, किमान २०,००० टन उत्पादन झाल्यास १३ दिवसांच्या वेतनाइतका प्रॉडक्शन बोनस; त्यानंतरच्या प्रत्येक जादा ४६० टनांच्या उत्पादनास एका दिवसाच्या वेतनाइतका बोनस; ३६,००० टनांच्या उत्पादनापर्यंत हा बोनस वाढत जावा, अशी तरतूद होती. लेबर ॲपेलेट ट्रायब्यूनलनें जादा ४६० टनांच्या उत्पादनास दीड दिवसांच्या वेतनाइतका बोनस देवविला होता आणि ३६,००० टनांवरील प्रत्येक ४६० टनांच्या उत्पादनास दोन दिवसांच्या वेतनाइतका बोनस देवविला होता. युनियननें ३६,००० टनांपर्यंतच्या बोनसच्या दरास मान्यता दिली होती; त्यांत बदल करण्याचें लेबर ॲपेलेट ट्रायब्यूनलला कारण नव्हतें, असें सुप्रीम कोर्टाचें मत पडलें. ३६,००० टनांपेक्षा जास्त उत्पादनाची शक्यता प्रारंभीं वाटली नाहीं. म्हणून त्याबाबत त्या वेळीं विचार झाला नाहीं. पण प्रत्येक जादा ४६० टनांस एका दिवसाच्या वेतनाइतका बोनस कंपनी देत राहिली. ह्या जादा उत्पादनासाठी कामगारांवर जादा कामाचा ताण पडला असला पाहिजे ह्यासाठी, आणि जादा उत्पादनाचे मानानें वेतनाची रक्कम वाढत नसल्यामुळें, ३६,००० ते ६०,००० टनांच्या उत्पादनास १½ ते २ दिवसांच्या वेतनाइतकें वाढत जाणारें जादा वेतन कामगारास मिळणें योग्य आहे, असें सुप्रीम कोर्टानें फर्माविलें. उत्पादन-बोनसची योजना अंमलांत असली तरी नफा-बोनसहि असायला हरकत नाहीं, असेंहि सुप्रीम कोर्टानें स्पष्ट केलें आहे.

---

१९५७ ची सिव्हिल अपिलें—नं. ५१०, ५११ व ५१२

### प्रत्येक राज्यांत खताचा कारखाना

भारतामधील अन्नधान्याचें उत्पादन १९६६ च्या सुमारास १०·५ कोटी टनांपर्यंत आणण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी ह्यादृष्टीनें तयारी करण्यांत येत आहे. अमेरिकेकडून १·७ कोटी टन अन्नधान्य मिळविण्यासंबंधीचा करार नुकताच झालेला असला तरी देशांतर्गत अन्नधान्याचें उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नांत शैथिल्य येतां कामा नये हें उघडच आहे. अन्नधान्याच्या उत्पादनाच्या वाढींत रासायनिक खतांना फार महत्त्वाचें स्थान आहे. रासायनिक खतांचा पुरवठा पुरेशा प्रमाणांत करतां यावा म्हणून येत्या कांहीं वर्षांत बरेच खताचे कारखाने स्थापन करण्याजी योजना मध्यवर्ती सरकारनें आंखली आहे. भारतीय संघराज्याच्या प्रत्येक घटक राज्यांत एक एक खताचा कारखाना उघडण्याचा सरकारचा विचार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस देशांत १० लाख टन नत्रयुक्त खतें निर्माण करण्याचा सरकारचा उद्देश आहे. सध्यां रासायनिक खताचे दोन कारखाने आहेत. त्यांपैकी एक बिहारमध्यें सिंद्री ह्या ठिकाणीं व दुसरा केरळमध्यें अलवाये ह्या ठिकाणीं आहे. चालू वर्षअखेर नांगल येथील खताचा कारखाना चालू होईल असा अंदाज आहे. त्याशिवाय नेवेली, रूरकेला आणि ट्रॉम्बे येथेंहि खताचे कारखाने उभारण्यांत येत आहेत. आंध्र प्रदेश, आसाम व पश्चिम बंगाल राज्यांतहि एक एक कारखाना स्थापन करण्यांत येत आहे. त्याशिवाय राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश राज्यांतहि लवकरच एक एक कारखाना काढण्यांत येणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस उत्पादन करण्यांत यावयाच्या १० लाख टन नत्रयुक्त खतांपैकी २ लाख टन खताचें उत्पादन खाजगी मालकीच्या कारखान्यांकडून होईल.

---

### दक्षिण भारतांत तेलशुद्धीचा कारखाना

दक्षिण भारतांत तेलशुद्धीचा एक कारखाना काढण्याचा विचार भारत-सरकार करीत आहे. ह्या कारखान्यांत दरसाल १० लाख टन तेल शुद्ध करण्याची सोय करण्यांत येईल. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत जी आर्थिक व औद्योगिक प्रगति होऊं घातली आहे तिला अनुसरून अशा तऱ्हेचा कारखाना दक्षिण भारतांत काढणें आवश्यक झालें आहे. तेलाच्या बाबतींत स्वयंपूर्णता मिळविण्यासाठी भारताला १·४ कोटी टन तेलाची गरज आहे. सध्यां खाजगी मालकीच्या विभागांत तेल शुद्ध करण्याचे चार कारखाने आहेत. त्यांपैकी एक आसाममध्यें दिग्बोई येथें, दोन मुंबईमध्यें व एक विजयापट्टम् येथें आहे. ह्या चार कारखान्यांत मिळून दरसाल ५५ लाख टन अशुद्ध तेल शुद्ध केलें जातें. सार्वजनिक मालकीच्या विभागांत असे आणखी दोन कारखाने उभारण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक बिहारमध्यें बरौनी येथें व दुसरा आसाममध्यें गोहाटी येथें स्थापन करण्यांत येणार आहे. १९६२ मध्यें ह्या कारखान्यांतून पूर्णांशानें कामास प्रारंभ होईल. असें झालें म्हणजे भारतामधील तेलशुद्धीच्या कारखान्यांची उत्पादनक्षमता दरसाल ८३ लाख टनांपर्यंत जाईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस १·४ कोटी टन तेलाचें उत्पादन होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. भारतांत अलीकडे कांहीं ठिकाणीं तेलाच्या खाणी सांपडल्या आहेत. नव्यानें उपलब्ध झालेल्या ह्या तेलाचें शुद्धीकरण करण्यासाठी १९६५ मध्यें आणखी दोन कारखाने काढण्यांत येण्याचा संभव आहे. त्यामधून आणखी २० लाख टन तेलाचें उत्पादन होईल. त्यांपैकी १० लाख टन तेल दक्षिण भारतांत स्थापन करण्यांत यावयाच्या कारखान्यांतून मिळेल. कारखान्याच्या जागेची निवड अद्याप झालेली नाहीं.

## भारतांतील खनिजांचें उत्पादन

### १९५९ मधील वैशिष्ट्यें

भारतांत १९५९ मध्यें उत्पादन झालेल्या खनिजांची एकूण किंमत १३९.८ कोटी रुपये भरावी असें इंडियन ब्यूरो ऑफ माइनन्सच्या तात्पुरत्या अंदाजावरून दिसून येतें. १९५८ मधील हाच आंकडा १३७.६ कोटी रुपये होता. १९५९ मधील खनिजांच्या उत्पादनांत या अंदाजांत १९४८ च्या ॲटॉमिक एनर्जी ॲक्ट खाली येणाऱ्या पेट्रोलियम आणि इतर खनिजांचा अंतर्भाव करण्यांत आलेला नाहीं.

एकूण उत्पादनाच्या किंमतींत १९५८ पेक्षा १९५९ मध्यें २.२ कोटींची किंवा १.६ टक्क्यांनीं ही जी वाढ झाली आहे ती प्रामुख्यानें कोळसा, अशुद्ध लोखंड, क्रोमाइट, शिसें आणि जस्ताचे गोळे, जिप्सम, डोलोमाइट आणि चुनखडी या खनिजांच्या उत्पादनांत वाढ झाल्यामुळें व सोन्याच्या किंमतींत वाढ झाल्यामुळें झाली आहे.

या सर्व खनिजांतहि कोळशाचें उत्पादन सर्वांत अधिक झालें. एकूण ९४.८ कोटी रुपये किंमतीचा ४७.८३ दशलक्ष टन कोळसा खणून काढण्यांत आला. इतर खनिजांचें उत्पादन पुढीलप्रमाणें :—

अशुद्ध तांबें-४,०४,००० टन, सोनें-५,१४४ किलोग्रॅम, इल्मेनाइट-३,०३,००० टन, अशुद्ध लोखंड-७९ लक्ष टन, चुनखडी-१ कोटी ६ लक्ष टन, अशुद्ध मँगेनीज-१२ लक्ष टन, अभ्रक (कच्चा)-२४,६९४ टन आणि मीठ-३२ लक्ष टन.

सन १९५९ मध्यें झालेल्या या उत्पादनापैकी सर्वांत अधिक म्हणजे ५०.३ कोटी रुपये किंमतीचें किंवा एकूण उत्पादनाच्या ३६ टक्के उत्पादन बिहार राज्यांत झालें. त्यानंतर प. बंगाल (२२ टक्के) व मध्य प्रदेश (११ टक्के) या राज्यांचा क्रम लागतो.

अशुद्ध धातु आणि खनिजें यांच्या निर्यातीपासून १९५९ मध्यें ४७ कोटी रुपये किंमतीचें परकीय चलन मिळालें. १९५८ मधील हाच आंकडा ४६ कोटी रुपये होता. ही निर्यात जपानकडे सर्वांत अधिक व त्याखालोखाल अमेरिकेकडे व इंग्लंडकडे झाली.

या वर्षी १५५.४ कोटी रुपये किंमतीच्या धातूंचें उत्पादन झालें. त्यामागील म्हणजे १९५८ मधील हाच आंकडा १११.५ कोटी रुपये होता. पक्क्या पोलादाच्या उत्पादनानें या वर्षी कमाल पातळी गांठली व १८ लक्ष टन पक्के पोलाद तयार झालें. १९५८ पेक्षा हें उत्पादन ४,७६,००० टनांनीं अधिक आहे.

अलोहित धातूंच्या उत्पादनाचा विचार करतां ॲल्युमिनियम १७,३५५ टन, तांबें ७६७४ टन, शिसें ३९५८ टन आणि चांदी ३८८१ किलोग्रॅम, याप्रमाणें उत्पादन झालें.

सन १९५८ मध्यें १२३.० कोटी रुपये किंमतीच्या धातूंची आयात झाली. १९५८ मधील हाच आंकडा १३२८.८ कोटी रुपये होता. यांपैकी ६८ टक्के आयात लोखंडी व पोलादी सामानाची असून, बाकीची ॲल्युमिनियम, तांबें, शिसें, जस्त, कथील, यांसारख्या अलोहित धातूंची झाली.

परदेशांतील बाजारपेठांत अशुद्ध मँगेनीजला पुरेशी मागणी नसल्यानें त्याच्या किंमतींत घट झाली, तर खप वाढल्यामुळें व पुरवठा कमी झाल्यामुळें तांबें आणि जस्त यांच्या किंमती वाढल्या, हीं १९५९ चीं वैशिष्ट्यें म्हणून सांगतां येतील.

## नर्मदा खोरें योजनेच्या कामाला प्रारंभ

गुजरात राज्याला समृद्धि प्राप्त करून देणाऱ्या नर्मदा खोरें योजनेच्या कामाला येत्या जुलैमध्यें अगर ऑगस्टच्या प्रारंभीं सुरुवात होणार आहे. ह्या योजनेचा समावेश दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आलेला होता. आतां मध्यवर्ती वीज व पाणी मंडळानें ह्या योजनेबद्दल आपली संमति कळविली आहे. तांत्रिकदृष्ट्या योजनेच्या उपयुक्ततेबद्दल आतां कांहीं शंका राहिलेली नाहीं. ही योजना दोन टप्प्यांनीं पूर्ण करण्यांत येणार असून त्यांतील पहिल्या टप्प्याचें काम दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम पुरा होण्याच्या आंत सुरू करण्यांत येणार आहे. ह्या पहिल्या टप्प्यांसाठी सुमारें ४३ कोटी रुपये खर्च येणार आहे. पहिल्या टप्प्यांत नर्मदा नदीवर नवापूर ह्या खेड्यानजीक बांधण्यांत येणाऱ्या धरणाचें काम आणि नर्मदा नदीच्या उजव्या कांठानें खोदण्यांत येणाऱ्या मुख्य कालव्याचें काम हातीं घेण्यांत येईल. ह्या कालव्याच्या पाण्यानें भडोच व बडोदा जिल्ह्यांतील १० लाख एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होईल असा अंदाज आहे. योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचें काम तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस हातीं घेण्यांत येईल. हें काम पूर्ण झालें म्हणजे नर्मदा नदीच्या परिसरांत राहणाऱ्या शेतकऱ्यांना चांगला फायदा होईल. दुसऱ्या टप्प्यांत नर्मदा नदीच्या धरणाची उंची आणखी वाढविण्यांत येईल आणि त्यामुळें अधिक उंचीवरून जाणारा कालवा खोदतां येईल. हा कालवा कच्छच्या रणापर्यंतहि नेतां येण्यासारखा आहे. कालवा पुरा झाल्यावर नर्मदेच्या पाण्याच्या प्रवाहाचा उपयोग करून वीज निर्माण करण्याचें केंद्र उभारण्यांत येणार आहे. त्यामुळें गुजरातच्या औद्योगीकरणाला जोराची चालना मिळेल. संकल्पित वीज-निर्मिति केंद्रांत ९० लाख किलोवॅट वीज निर्माण करण्यांत येईल.

---

### खासगी क्षेत्रांतील आयातीसाठी दिलेल्या रकमा

(आंकडे कोटी रुपयांचे)

| | १९५९ | १९५८ |
|---|---|---|
| १ अन्न, पेयें, तंबाखू | १८.४ | १९.८ |
| २ कच्चा माल | १५६.० | १३४.० |
| खनिज तेलें | ८१.१ | ७१.४ |
| वनस्पतिजन्य तेलें | ४.५ | ४.५ |
| कपास | ३०.८ | २३.१ |
| लोकर | ६.१ | ६.२ |
| ३ पक्का व अर्ध पक्का माल | ३१८.० | ३८७.४ |
| कटलरी, हार्डवेअर | ८.५ | ११.० |
| रसायनें | २५.७ | २३.४ |
| औषधें | ९.० | १०.७ |
| रंग | १०.८ | १३.८ |
| विजेचें साहित्य | १४.२ | १६.७ |
| कागद, स्टेशनरी | ८.१ | ७.५ |
| रेयॉन कापड | १२.७ | ९.८ |
| लोकरी सूत व कापड | ३.३ | ५.० |
| मशिनरी | ९५.६ | १२१.९ |
| लोखंड-पोलाद | ३२.१ | ४३.८ |
| इतर धातू | २३.८ | २५.५ |
| वहानें | २७.७ | २३.३ |
| इतर | २४.६ | ५६.५ |

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.